क्रमांक १५७६५/क-१.
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक २० ऑक्टोबर, २०२३

**संदर्भ :- या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक १४९६३/क-१, दि. २७ सप्टेंबर, २०२३**

**:: कार्यालयीन आदेश ::**

महाराष्ट्र विधानमंडळाचे सन २०२३ चे आगामी हिवाळी अधिवेशन नागपूर येथे गुरूवार दिनांक ७ डिसेंबर, २०२३ रोजीपासून सुरू होणार आहे. या अनुषंगाने या सचिवालयाचे कामकाज विधान भवन, नागपूर येथे रविवार, दिनांक २६ नोव्हेंबर, २०२३ रोजीपासून सुरू होईल. विधानमंडळाच्या नागपूर येथील अधिवेशनाच्या अनुषंगाने विधान भवन, नागपूर येथील कार्यालयात मा.पीठासीन अधिकारी, मा.उप पीठासीन अधिकारी, दोन्ही सदनांचे मा.विरोधी पक्षनेता यांच्या दालनांची व कार्यालयीन कक्षांची व्यवस्था, या सचिवालयातील अधिकाऱ्यांची निवास व वाहन व्यवस्था तसेच या सचिवालयातील कर्मचाऱ्यांची निवास व्यवस्था, संबंधित मान्यवर तसेच अधिकारी/कर्मचारी विधान भवन, नागपूर येथे पोहोचण्यापूर्वी होणे आवश्यक आहे.

सदरहू व्यवस्था करण्याची जबाबदारी विधान भवन, नागपूर येथील कार्यालयात कार्यरत असलेले श्री.कैलास पाझारे, कक्ष अधिकारी व श्रीमती स्नेहलता खोब्रागडे, कक्ष अधिकारी यांच्यावर सोपविण्यात येत आहे. उक्त अधिकारी यांनी श्री.वि.श. कोमटवार, अवर सचिव यांचे मार्गदर्शन घेऊन त्यांच्यावर सोपविण्यात आलेली जबाबदारी पूर्ण करावी. तसेच व्यवस्थेसंदर्भातील कामकाजाचा अहवाल प्रत्येक आठवड्याच्या सोमवारी मा.सचिव-१ (कार्यभार) यांना ई-मेल व्दारे सादर करावा.

आदेशानुसार,
(सही)
**(सुभाष नलावडे)**
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**प्रति,**

१) श्री.कैलास रा.पाझारे, कक्ष अधिकारी, विधान भवन, नागपूर.

२) श्रीमती स्नेहलता अ.खोब्रागडे, कक्ष अधिकारी, विधान भवन, नागपूर.

..२/-

**प्रतिलिपी :-**

१) मा.सचिव-१ (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

२) मा.सचिव-२ (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

३) सह सचिव (श्री.साठ्ये), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

४) उप सचिव (श्री.कुडतरकर), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

५) अवर सचिव (श्री.कोमटवार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

६) कक्ष अधिकारी, ग-१ कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

७) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

८) क-२ (संगणक) कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

९) निवडनस्ती.

\\mls-dataserver\C Branch\1401\C-101\Local Disk (d)\E Drive\2023\NAGPUR SESSION 2023\Routin Order.docx